# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 17 November 2024

## Time: 7.10 to 7.20 AM

## Language Marathi

## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

## **प्रादेशिक बातम्या**

## **दिनांक: १७ नोव्हेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

- आदर्श आचारसंहिता पालनाबाबत केंद्रीय निवडणूक आयोगाची भाजप आणि काँग्रेसला नोटीस
- राज्यात विधानसभा निवडणुका अखेरच्या टप्प्यात, मुंबईत आज महाविकास आघाडीची समारोपाची जाहीर सभा
- निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा भाजप बूथ कार्यकर्त्यांशी संवाद
- मतदार जनजागृतीसाठी स्वीप उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रमांचं आयोजन
  आणि
- यंदाचा अनंत भालेराव पुरस्कार निवृत्त पोलिस अधिकारी डॉ. मीरा बोरवणकर यांना जाहीर

****

विधानसभा निवडणुकांच्या प्रचारात आदर्श आचारसंहिता पालनाबाबत केंद्रीय निवडणूक आयोगानं भाजप आणि काँग्रेसला नोटीस बजावली आहे. या दोन्ही पक्षांनी एकमेकांविरोधात प्रचारादरम्यान आचारसंहिता भंगाच्या तक्रारी दाखल केल्यानंतर, आयोगानं या नोटिसा बजावल्या. उद्या सोमवारी दुपारी एक वाजेपर्यंत दोन्ही पक्षांनी याबद्दल उत्तर देण्याचे निर्देश आयोगानं दिले आहेत. लोकसभा निवडणुकांसाठी २२ मे रोजी जारी केलेल्या सूचनांचं पालन करून दोन्ही पक्षांच्या स्टार प्रचारक आणि नेत्यांनी प्रचारादरम्यान सभ्यतेचं पालन करावं असंही या नोटिसीत म्हटलं आहे.

****

राज्यात विधानसभा निवडणुका अखेरच्या टप्प्यात आल्या असून, उमेदवारांनी प्रचाराला वेग दिला आहे. मुंबईत आज महाविकास आघाडीची समारोपाची जाहीर सभा होणार असून, या सभेसाठी शरद पवार, उद्धव ठाकरे, नाना पटोले यांच्यासह सर्व प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत.

तर भाजपच्या वतीने तीन केंद्रीय मंत्री आणि गुजरातच्या मुख्यमंत्र्यासह अनेक वरिष्ठ नेते प्रचारासाठी मुंबईत दाखल झाले आहेत.

बहुजन समाज पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा, उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री मायावती यांची आज दुपारी पुण्यात प्रचार सभा होणार आहे.

****

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नमो ॲपच्या माध्यमातून, महाराष्ट्रातल्या भाजपच्या बूथ कार्यकर्त्यांशी संवाद साधला. 'मेरा बूथ सबसे मजबूत' या संकल्पनेतून साधलेल्या या संवादात, पंतप्रधानांनी महायुतीच्या कामाबद्दल जनता समाधानी असल्याचा विश्वास व्यक्त केला. भाजप सुरुवातीपासून मध्यमवर्गाच्या आकांक्षांवर लक्ष केंद्रीत करत आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत मध्यमवर्गाचं योगदान सगळ्यात जास्त असल्याचं लक्षात घेऊन, त्यांच्यावरचा कराचा बोजा कमी केल्याचं पंतप्रधानांनी स्पष्ट केलं.

****

केंद्र सरकारने आरक्षणाचं प्रमाण ५० टक्क्यांच्या वर न्यावं, आणि जातीनिहाय जनगणना करावी असं आव्हान, काँग्रेसच्या नेत्या प्रियांका गांधी यांनी दिलं आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात शिर्डी मतदारसंघातल्या साकुरी इथल्या प्रचार सभेत काल त्या बोलत होत्या.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी काल अमरावती जिल्ह्यात धामणगाव रेल्वे इथं प्रचारसभा घेतली. देशाच्या विकासात काँग्रेसनं अमूल्य योगदान दिलं असून, काँग्रेस नेहमीच शेवटच्या घटकाचा सर्वात आधी विचार करते असं ते म्हणाले.

****

येत्या ५ वर्षात मुंबईकरांचा रेल्वे प्रवासाचा अनुभव मोठ्या प्रमाणात सुखद होईल, असं आश्वासन रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिलं आहे. ते काल मुंबईत वार्ताहर परिषदेला संबोधित करत होते. मनोरंजन क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान आणि कुशल मनुष्यबळ यावं यासाठी इंडियन इन्स्टिटयूट ऑफ क्रिएटीव्ह टेक्नॉलॉजी या स्थापना करायला केंद्र सरकारने मंजुरी

दिली असून, यातली पहिली संस्था मुंबईत सुरू होणार असल्याची घोषणा, वैष्णव यांनी यावेळी केली.

****

महाराष्ट्रात राजकीय स्थिरतेसाठी तसंच विकास आणि सुरक्षिततेसाठी महायुती हाच पर्याय आहे, असं मत भारतीय जनता पक्षाचे नेते सत्यपाल सिंह यांनी व्यक्त केलं आहे. ते काल छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. कायदा आणि सुरक्षितेच्या दृष्टीने महाराष्ट्र हे चांगलं राज्य असल्यानं इथं गुंतवणूकही वाढत आहे असं सिंह यांनी सांगितलं.

****

वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांची काल छत्रपती संभाजीनगर इथं प्रचारसभा झाली. मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय आणि मुस्लिमांचं आरक्षण संसदेत आणि विधानसभेत लोकप्रतिनिधीच वाचवत असतात, हे आरक्षण वाचवण्यासाठीच वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांना निवडून देण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

****

जालना जिल्ह्यात महायुतीचे भोकरदनचे उमेदवार संतोष दानवे यांनी काल ग्रामीण भागात प्रचार फेरीच्या माध्यमातून मतदारांशी संवाद साधला.

छत्रपती संभाजीनगर इथं महाविकास आघाडीचे नेते अंबादास दानवे यांनी काल पैठणचे महाविकास आघाडीचे उमेदवार दत्ता गोर्डे यांच्या प्रचारार्थ चिंतेपिंपळगाव इथं सभा घेतली.

औरंगाबाद पश्चिम विधानसभा मतदार संघात महायुतीचे उमेदवार संजय शिरसाट यांनी जनतेशी संवाद साधला.

लातूर शहर मतदारसंघाच्या महायुतीच्या उमेदवार डॉ.अर्चना पाटील चाकूरकर यांच्या प्रचारार्थ आंध्रप्रदेशचे उपमुख्यमंत्री आणि दाक्षिणात्य सुपरस्टार पवन कल्याण यांनी रोड शो केला.

भाजप नेते भागवत कराड यांनी काल धाराशिव इथं माध्यमांशी संवाद साधला. राज्याच्या विकासासाठी आवश्यक असलेलं स्थिर सरकार महायुतीच देऊ शकते, असं त्यांनी नमूद केलं.

****

विधानसभा निवडणुकीत राज्यात मतदानाचं प्रमाण वाढावं यासाठी राज्यात अनेक ठिकाणी विशेष संकल्पना घेऊन मतदान केंद्र उभारली जात आहेत. यात जैवविविधता, सांस्कृतिक-सामाजिक वारशांचं दर्शन, स्तन्यदा-गर्भवती महिलांसाठी हिरकणी मतदान केंद्र, युवा,

दिव्यांग तसंच महिला संचलित विशेष मतदान केंद्र उभारली जात आहेत. दिव्यांग मतदारांसाठी रॅम्प, व्हीलचेअर, पिण्याचं पाणी तसंच स्वच्छतागृहांची सोय देखील उपलब्ध असणार आहे.

****

येत्या निवडणुकीत मतदान करण्याचं आवाहन सर्व मतदारांना करण्यात येत आहे. छत्रपती संभाजीनगर इथली एमबीएची विद्यार्थिनी असलेल्या साक्षी वैद्य या नवमतदार तरुणीनेही सर्वांना मतदान करण्याचं आवाहन केलं आहे...

**बाईट – साक्षी वैद्य**

****

नांदेड इथल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ मनोहर चासकर यांनी नागरिकांना येत्या बुधवारी २० नोव्हेंबरला , मतदान करण्याचं आवाहन केलं आहे.

**बाईट – कुलगुरू डॉ मनोहर चासकर**

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज सांगली जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

या बातम्या आकाशवाणीच्या छत्रपती संभाजीनगर केंद्रावरुन देत आहोत

****

स्वीप कार्यक्रमाअंतर्गत राज्यभर मतदार जनजागृतीपर उपक्रम राबवले जात आहेत. लातूर जिल्ह्यात अभंग, गवळणी, भारुड, गोंधळगीत, पोवाडा अशा पारंपरिक कलाप्रकारांचा अभिनव वापर केला जात आहे. जिल्ह्यात १२१ शाळांमधल्या विद्यार्थ्यांमार्फत १ लाख ३ हजारांपेक्षा जास्त पालकांपर्यंत पोहोचत मतदानाचं संकल्पपत्र भरून घेण्यात आलं.

लातूर इथं काल जिल्हा क्रीडा संकुलात वॉकेथॉन, मॅरेथॉन रॅली काढण्यात आली. या वॉकेथॉन स्पर्धेपूर्वी युवक, युवती आणि खेळाडूंना मतदार जागृतीची शपथ देण्यात आली.

तुळजापूर इथं ३७ शाळेतील ३ हजार ७०० विद्यार्थी तसंच ३२१ शिक्षकांसह जनजागृती फेरी काढण्यात आली. हातात घोषवाक्याचे फलक घेऊन शहरातील विविध भागातून या फेरीनं जनजागृती केली.

नांदेड शहरात काल मतदान जनजागृतीसाठी दुचाकी फेरी काढण्यात आली. या जनजागृती फेरीत महापालिकेतील सर्व शासकीय अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले होते.

****

निवृत्त पोलिस अधिकारी डॉ. मीरा बोरवणकर यांना यंदाचा अनंत भालेराव स्मृती पुरस्कार जाहीर झाला आहे. अनंत भालेराव प्रतिष्ठानचे संजीव कुलकर्णी आणि हेमंत मिरखेलकर यांनी नांदेड इथं ही माहिती दिली. मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि पन्नास हजार रुपये असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. येत्या ८ डिसेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर इथं मराठवाडा साहित्य परिषदेच्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात होणाऱ्या विशेष कार्यक्रमात डॉ. मीरा बोरवणकर यांना हा पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे.

****

राज्याचं टपाली मतपत्रिका राज्य समन्वय केंद्र छत्रपती संभाजीनगर इथं उभारण्यात आलं आहे. सर्व २८८ विधानसभा मतदार संघातल्या टपाली मतपत्रिकांचं संकलन तसंच वितरण या केंद्रातून केलं जात आहे. मतदान झालेल्या सुमारे २२ हजाराहून अधिक तसंच कोऱ्या मतपत्रिकांचं हस्तांतरण या ठिकाणी सुरु असल्याची माहिती, नोडल अधिकारी प्रभोदय मुळे यांनी दिली. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी काल या केंद्राला भेट देऊन कामाची पाहणी केली.

****

जालना जिल्ह्यातल्या पाच विधानसभा मतदार संघांमध्ये एक हजार सातशे पंचावन्न मतदान केंद्र आहेत. या मतदान केंद्रांवर दिव्यांग मतदारांना ने-आण करण्यासाठी व्हीलचेअर पुरवण्यात आल्या असून, सर्वच केंद्रावर दिव्यांग मतदारांना मदत करण्यासाठी विशेष दोन स्वयंसेवक नेमण्यात आले आहेत.

****

परभणी जिल्ह्यातल्या पाथरी मतदारसंघात एकूण ५३१ मतदारांचं गृहमतदान घेण्यात आलं. यामध्ये ४८५ वयोवृद्ध आणि ४६ दिव्यांगांचा समावेश आहे.

उस्मानाबाद विधानसभा मतदारसंघात ४४७ ज्येष्ठ नागरिक तसंच ६९ दिव्यांग मतदारांनी गृहमतदान सुविधेमार्फत मतदान केलं.

****

बीडच्या केज मतदार संघातले वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार सचिन चव्हाण प्रचार करत असताना, त्यांच्या तोंडाला काळं फासत मारहाण केल्याची घटना काल घडली.

सचिन चव्हाण यांनी पक्षविरोधी भूमिका घेतल्याचा आरोप आघाडीचे जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे यांनी केला आहे.

दरम्यान, परळी मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार राजेसाहेब देशमुख खोडवा सावरगाव इथं प्रचारासाठी गेले असता, काही लोकांनी घोषणाबाजी केली.

****